सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन विक्रमगड

मु.पो-शिळ, पो-ओंदे,झडपोली शिळ रोड, तालुका-विक्रमगड,जिल्हा — पालघर -४०१६०५
E mail- 1547office@msbte.com , office.gpvikramgad@dtemaharashtra.gov.in,

जा.क्र.शातंनिवि/विवि/सुचना/२०२६/542 दिनांक : 24/06/2026

## विद्यार्थ्यांना महत्वाची सुचना

विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर शाखा बदल करण्याबाबत..

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनाल, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.१०/पदविका-मा.प्र./विद्यार्थी संस्था बदल/२०२६/३०३, दिनांक २२/०६/२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये या संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना या सुचनेद्वारे सुचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये पहिल्या वर्षानंतर याच संस्थेत शाखा बदल करावयाचा असल्यास इच्छुक विद्यार्थ्यांनी खाली नमुद दिनांकास अर्ज सादर करावा. सदर अर्ज शाखा बदल समितीकडे /विद्यार्थी विभागात प्रत्यक्ष जमा करावा.

तसेच ज्या विद्यार्थ्यांचा प्रथम वर्ष प्रवेश TFWS, EWS मधुन झालेला आहे असे विद्यार्थी शाखा बदलास पात्र राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | दिनांक | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १. | २४.०६.२०२६ ते २८.०६.२०२६ | अर्ज स्विकृती (Annexure — A) व कागदपत्रांसह |
| २. | २९.०६.२०२६ | तात्पुरती व अंतिम गुणवत्ता यादी तसेच शाखा बदल |

शाखा बदल करण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे,

१. पहिल्या व दुसऱ्या सत्राची गुणपत्रिका (उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण)
२. दिलेल्या नमुन्यातील हमीपत्र
३. प्रथम वर्ष प्रवेशाचे ॲलॉटमेंट लेटर

टिप : १. दिनांक २८ जुन २०२६ नंतर येणाऱ्या कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नाही यांची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
२. शासकीय तंत्रनिकेतन, विक्रमगड या संस्थेचा DTE कोड क्रमांक ३०१३ असा आहे.

सोबत : शाखा बदल व हमीपत्र अर्ज.

Sondhe
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, विक्रमगड

प्रति : सुचना फलक, शासकीय तंत्रनिकेतन, विक्रमगड
प्रत : १. प्रथम वर्ष समन्वयक, विज्ञान व मानव्य विभाग, शा. तं. विक्रमगड
२. सर्व विभागप्रमुख, संगणक अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी शासकीय तंत्रनिकेतन, विक्रमगड/- सदरील सुचना सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner